# सापळा केस

दिनांक २४/०६/२०२१

**आलोसे सुर्यकांत पांडुरंग दहीफळे वय ५३ वर्षे व्यवसाय वाहन परिक्षक, रा.प.म.गंगाखेड आगार (वर्ग ४) यांनी ५,०००/— रू लाच स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथे दि. २३/०६/२०२१ रोजी तक्रार दिली की, ते रा.प.म. गंगाखेड डेपो येथे एस.टी.चालक आहेत. त्यांना सुमारे तीन वर्षापुर्वी पॅरालीलीस चा झटका आला होता. त्यामुळे ते जवळपास एक वर्ष आजारी होते. त्यानंतर सुमारे दिड वर्षानंतर ते कर्तव्यावर हजर झाले. तेंव्हा ते गंगाखेड डेपो चे मॅनेजर श्री.किशन कराळे यांनी त्यांना धावपळीची डयुटी न लावण्याची विनंती केली तेंव्हा त्यांनी तक्रारदार यांना पैशाची मागणी केली व डेपोचे वाहन परिक्षक श्री. दहीफळे यांना भेटण्यास सांगीतले. म्हणून ते डेपोचे वाहन परिक्षक श्री.दहीफळे यांना भेटले असता त्यांना धावपळीची डयुटी न लावण्याबाबत सांगीतले असता गंगाखेड डेपो चे मॅनेजर श्री.किशन कराळे व डेपोचे वाहन परिक्षक श्री. दहीफळ हे यांना तक्रारदार यांना डीजल भरण्याची डुयटी लावण्यासाठी दरमाह ३०००/— रू लाचेची मागणी केली वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत नमुद आलोसे यांनी दिनांक २४/०६/२०२१ रोजी तक्रारदार यांना चालकाची डयुटी न देता डिझेल पंपावर डयुटी देण्यासाठी गंगाखेड डेपोचे वाहन परिक्षक श्री. दहीफळे यांनी १२,०००/— रूपये लाचेची मागणी केली. दि. २४/०६/२०२१ रोजी सापळा कार्यवाही आजमाविण्यात आली असता आलोसे यांनी त्यांचे कक्षामध्ये व त्यापैकी ५०००/— रू पहिलास हप्ता म्हणुन ५०००/— रूपये पंचासमक्ष स्विकारली आहे. आलोसे यांना ताब्यात घेतले असुन त्यांचे विरूध्द पो.स्टे.गंगाखेड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

स्दरची सापळा कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती.कल्पना बारवकर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.भरत केशवराव हुंबे, पोना/कटारे, पोशि/चटटे, पोशि/धबडगे पोह/हनुमंते, पोना/मुखीद, पोना/कुलकर्णी, मपोशि/दंडवते, मपोशि/टेहरे, चापोना/कदम,चापोह/हबीब अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचाराविरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाच लुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनीक्रमांक ०२४५२—२२०५९७**

**टोलफ्रीक्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक,ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ८८८८८४१९६५
श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ९६६५४७९३३३
श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी — ७०२१००२११०